# वाङ्‌मय संकल्पना विकसित होणे आवश्यक

## विद्यापीठातील समीक्षा पुरस्कार प्रदान सोहळयात डॉ. सुधीर रसाळ यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान समारंभात मान्यवर.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारत आणि भारतीय वाङमय ही संकल्पना विकसित होण्यासाठी भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील भाषा आपल्यामधील काही लोकांनी आत्मसात केले पाहिजे. ही भाषिक देवाण-घेवाण झाल्याशिवाय भारतीय नावाची संकल्पना अस्तित्वात येऊ शकणार नाही, ही येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादान ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी

शाहू सभागृहामध्ये मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान समारंभप्रसंगी ते बोलत होते.

मराठीतील नामवंत समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून मराठीतील महत्त्वाच्या समीक्षा ग्रंथाला/समीक्षकाला दिला जाणारा पहिला डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना ज्येष्ठ लेखक वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते देण्यात आला.

डहाके म्हणाले, डॉ.रसाळ यांनी लिहिलेले ग्रंथ समीक्षेचे वैभव वाढविणारे आहे. आजकाल, अभ्यासपूर्ण लेखनातून मांडणी करण्याचे प्रमाण फारच दुर्मीळ होत चालले आहे. ही वैभवशाली प्रजाती नष्ट होत चालेली आहे, असे वाटते. डॉ.रसाळ यांच्या वाङ्‌मयीन संस्कृती या पुस्तकामधून ही खंत व्यक्त केलेली आहे. प्र-कुलगुरू डॉ.डी. टी.शिर्के म्हणाले, डॉ.म. सु.पाटील मराठीतील नामवंत समीक्षक होते. भारतीय साहित्यशास्त्रात महत्त्वाचा समीक्षा विचार त्यांनी मांडला. डॉ.सुधीर रसाळ यांच्या समीक्षेने मराठी साहित्यामध्ये फार मोलाची भर घातली.

यावेळी म. सु. पाटील यांच्या कन्या ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री नीरजा धुळेकर, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. रमेश वरखेडे, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. प्रतिभा कणेकर, ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे या मान्यवरांनी चित्रफितीद्वारे विचार व्यक्त केले. याप्रसंगी म. सु. पाटील लिखित 'साहित्यकृतींचे वाचन आणि निर्वचन' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाकडून डॉ. रसाळ यांना प्रदान करण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. पुरस्काराच्या स्वरूपामध्ये ५१ हजार, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र देण्यात आले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ.रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. राजेश पाटील, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.